# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 30/08/2021 (सोमवार)

(सायंकाळ)

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कोंढाळी :– दिनांक 04/11/2018 चे 15.30 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे अप. क्र. 38/2018 कलम 376(2)(एन)(एल), 376 (3), 506 भादवी सहकलम 5(आय) (2)(5)केएल बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 04/11/2018 चे पूर्वी दरम्यान 16 वर्षीय पीडित ही फिर्यादीची मुलगी आहे. पीडिता मुलगी हि मंदबुद्धी अल्वयीन असून घरी एकटी असल्याचे पाहुन आरोपी नामे – आकाश बंकट येदानी, वय 22 वर्ष, रा. तरोडा काटोल जि. नागपूर याने बरेच वेळा तिचे वर जबरीसंभोग केला. त्यामुळे तिला 2  1/2 महीन्याची गर्भ धारना झाली. आरोपीने तिला याबाबत कोणालाही काही सांगिल्यास तिला जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपीला दिनांक 04/11/2018 चे 23.13 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक श्री. शाम गव्हाणे, पो.स्टे. कोंढाळी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 30/08/2021 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. के. जी. राठी, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 376 (2) (3) भादंवि. मध्ये 20 वर्ष सश्रम कारावास व 20,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 वर्ष सश्रम कारावास, कलम 506 भादंवि मध्ये 6 महीने सश्रम कारावास व 1,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. लक्ष्मी खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. किशोरकुमार वैरागडे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकर तराळे, नत्थु इवनाते, पोहवा श्री. शेखर मेश्राम, मनोज तिवारी, अंसार सौदागर यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर